# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे–०४

**माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) सन २०२१ च्या पुरवणी परीक्षेची आवेदनपत्रे ऑनलाईन पध्दतीने सादर करावयाच्या तारखांबाबत...**

## प्रकटन

उपरोक्त विषयाबाबत कळविण्यात येते की, राज्यात कोविड–१९ या विषाणूच्या प्रादुर्भावामुळे शासनाने लॉकडाऊन/संचारबंदी जाहीर केली होती व वेळोवेळी सदरचा कालावधी वाढविल्यामुळे माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षा व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा सन २०२१ परीक्षांचे निकाल माहे जुलै–ऑगस्ट २०२१ मध्ये जाहीर झालेले आहेत. त्यामुळे महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत घेण्यात येणारी पुरवणी परीक्षा जुलै–ऑगस्ट ऐवजी शासन मान्यतेने तद्नंतर घेण्याचे प्रस्तावीत आहे. त्यानुसार माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) परीक्षेस **पुनर्परीक्षार्थी, नाव नोंदणी प्रमाणपत्र प्राप्त झालेले खाजगी विद्यार्थी तसेच श्रेणीसुधार योजनेअंतर्गत व तुरळक विषय घेवून प्रविष्ट होणाऱ्या, ITI (औद्योगिक प्रशिक्षण संस्थेव्दारे ) Transfer of Credit** घेणाऱ्या विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे ऑनलाईन पध्दतीने घेण्यात येणार आहेत.

सदर परीक्षेस प्रविष्ठ होऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांनी परीक्षेचे आवेदनपत्र ऑनलाईन पध्दतीने इ.१०वी व इ.१२वी साठी **www.mahahsscboard.in** या संकेतस्थळावर भरावयाची असून त्यांच्या तारखा खालीलप्रमाणे.

| शुल्क प्रकार | विद्यार्थ्यांनी माध्यमिक शाळा, उच्च माध्य.शाळा/ कनिष्ठ महाविदयालयांमार्फत पुनर्परीक्षार्थी, यापूर्वी नाव नोंदणीप्रमाणपत्र प्राप्त झालेले खाजगी विद्यार्थी, श्रेणीसुधार व तुरळक विषय घेवून प्रविष्ठ होणारे, ITI (औद्योगिक प्रशिक्षण संस्थेव्दारे Transfer of Credit घेणारे विद्यार्थी )ऑनलाईन पध्दतीने आवेदनपत्रे भरावयाच्या तारखा | माध्यमिक शाळांनी, उच्च माध्य. शाळांनी /कनिष्ठ महाविदयालयांनी बँकेत चलनाद्वारे शुल्क भरावयाच्या तारखा | माध्यमिक शाळा, उच्च माध्य. शाळा/कनिष्ठ महाविदयालयांनी विभागीय मंडळाकडे शुल्क भरल्याच्या चलनासह विद्यार्थ्यांच्या याद्या जमा करावयाची तारीख |
|---|---|---|---|
| नियमित शुल्क | बुधवार, दिनांक ११/०८/२०२१ ते बुधवार, दिनांक १८/०८/२०२१ | सोमवार, दिनांक २३/०८/२०२१ ते मंगळवार, दिनांक २४/०८/२०२१ | बुधवार दिनांक २५/०८/२०२१ |
| विलंब शुल्क | गुरुवार, दिनांक १९/०८/२०२१ ते शनिवार, दिनांक २१/०८/२०२१ | | |

सदर परीक्षेची आवेदनपत्रे ही ऑनलाईन पध्दतीने स्विकारण्यात येणार असल्याने विद्यार्थ्यांनी आवेदनपत्रे त्यांच्या माध्यमिक शाळा, उच्च माध्य.शाळा/कनिष्ठ महाविद्यालयामार्फत भरावी. सर्व माध्यमिक शाळांचे मुख्याध्यापक, उच्च माध्य.शाळा/कनिष्ठ महाविदयालयाचे प्राचार्य यांनी ऑनलाईन पध्दतीने आवेदनपत्रे भरण्यासाठी खालील बाबी लक्षात घ्याव्यात.

१. **श्रेणीसुधार करु इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी** सन २०२१ मध्ये **श्रेणीसुधार** अंतर्गत नोंदणी केलेल्या विद्यार्थ्यांना दि. २८/०५/२०२१ व दि.०२/०७/२०२१ च्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार जादाची एक संधी या परीक्षेव्दारे उपलब्ध करुन देण्यात येत आहे. सदर विद्यार्थ्यांनी गतवर्षी परीक्षा शुल्क अदा केलेले असल्याने फक्त अशाच विद्यार्थ्यांना वेगळे शुल्क भरण्याची आवश्यकता नाही. तथापि नव्याने आवेदनपत्र भरणे अनिवार्य राहील. त्याचप्रमाणे सन २०२१ च्या नियमित विद्यार्थ्यांना सन २०२१ मधील पुरवणी परीक्षा **व** सन २०२२ मधील मुख्य परीक्षा **अशा लगतच्या दोन संधी उपलब्ध** राहतील याची नोंद घ्यावी.

२. नियमित शुल्कासह तसेच विलंब शुल्कासह आवेदनपत्रे सादर केलेल्या विद्यार्थ्यांचे शुल्क दोन स्वतंत्र चलनाद्वारेच भरण्यात यावे.

३. सर्व विभागीय मंडळातील माध्यमिक शाळा, उच्च माध्यमिक शाळा/**कनिष्ठ महाविद्यालयांनी** शुल्क प्रचलित पध्दतीने मंडळाने निश्चित केलेल्या बॅकेच्या खात्यामध्ये **Virtual Account** व्दारे जमा करुन चलनाची प्रत व विद्यार्थ्यांच्या याद्या दिलेल्या मुदतीतच संबंधित विभागीय मंडळाकडे सादर कराव्यात.

४. **आवेदनपत्रे नियमित शुल्काने भरावयाच्या तारखामध्ये कोणतीही मुदतवाढ देण्यात येणार नाही.**

(डॉ अशोक भोसले)
सचिव,
राज्य मंडळ, पुणे-०४

दिनांक— ०९/०८/२०२१